**MHWS080007762022**

## रे.मु.नं. ४३/२०२३ मधील नि.क्र. २० वरील आदेश

**१.** प्रस्तुत अर्ज वादीतर्फे सदरचा दावा व रे.मु.नं.४७/२०२३ एकत्ररित्या चालवण्याबाबत आदेश होउन मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

**२.** वादी अर्जातील कथनानुसार, सदचा दावा दावा मिळकतीचा ताबा मिळणेसाठी, वैकल्पीक रित्या वाटपाकरीता व दरम्यानचे उत्पन्नाकरीता तसेच दावा मिळकतीतील बोअरवेलचे खर्च व उत्पन्नाबाबत खुलासा देण्याबाबत दाखल केला आहे. त्याचप्रमाणे प्रतिवादी जगन बाजड यांनी देखील रे.मु.न.४७/२०२३ हा दावा कायम मनाईकरीता वादीच्या विरुध्द दाखल केलेला आहे. दोन्ही दावे एकाच वादमिळकतीबाबत दाखल असून पुराव्याकरीता प्रलंबित आहेत.

**३.** पुढे वादीच्या अर्जातील कथनानुसार, वादी क्र.०२ ने दावामिळकतीची मालकी सांगून दावा मिळकत जरी प्रतिवादी क्र.०१ च्या नावे खरेदी केली असली तरी एकत्र कुटूंबाची मिळकत विक्री करुन आलेल्या पैशातून खरेदी केलेली असल्याचे नमूद करुन सदर मिळकतीचा ताबा मागितलेला आहे. सदर दाव्याचे कामी वादींनी वैकल्पीक रित्या वाटपाची मागणी केलेली आहे. याउलट प्रतिवादी क्र.०१ ने रे.मु.नं.४७/२०२३ मधील दावा मिळकतीबाबत वादी क्र.१ विरुध्द कायम मनाई मागितलेली आहे. सदरच्या दाव्यात प्रतिवादी क्र.०१ ने दावा मिळकत स्वत:च्या मालकीची असल्याचे नमूद केलेले आहे. सदर दोन्ही दाव्यांमध्ये समानता असून एकसारखे मुददे नमूद केलेले आहेत. त्यामुळे न्यायालयास दि.प्र.सं. कलम १५१ नुसार दोन्ही दावे एकत्रीत चालवता येतील. त्याकरीता पक्षकारांच्या संमतीची आवश्यकता नसून दोन्ही दाव्यातील निर्णय परस्पर विरोधी येउ नयेत याकरीता तसेच त्यातून अन्य दावे निर्माण होउ नये याकरीता सदरचे दोन्ही दाव्यांमध्ये एकच पुरावा नोंदवून एकच न्यायनिर्णय देणे आवश्यक ठरते त्यामुळे सदरचे दोन्ही दावे एकत्रीतपणे चालविण्यात यावे अशी विनंती केली.

**४.** सदर अर्जावर प्रतिवादीतर्फे म्हणणे दाखल केले. प्रतिवादीच्या

म्हणण्यानुसार दोन्ही दाव्यातील पक्षकार वेगळे असून दाव्यास घडलेले कारण देखील भिन्न स्वरुपाचे आहे. सदर दोन्ही दाव्यात नमूद केलेली मागणी ही देखील एकसारखी नसल्याने सदरचे दोन्ही दावे एकाचवेळी निकाली करणेस अडचणी निर्माण होणार आहे. वादींचा अर्जास दुजोरा देणारी कोणतीही कायदेशीर तरतूद नसल्याने व सदरचे दोन्ही दावे स्वतंत्रपणे चालवून निकाली करणे आवश्यक आहे. वादींनी सदरचा अर्ज केवळ दावा लांबणीवर टाकण्याच्या उददेशाने दिलेला असल्याने नामंजूर करावा अशी विनंती केली.

**५.** वादीतर्फे युक्तीवादादरम्यान असे कथन करण्यात आले आहे की, दोन्ही दावे एकाच दावा मिळकतीबाबत असून दोन्ही दाव्यातील ताकीद अर्ज एकमेकांविरोधात ताबे वहीवाटीस हरकत करु नये याकरिता दाखल केलेले आहेत. एका दाव्यातील वाद कथने ही दुस—या दाव्यातील बचाव असून एकसारख्या मुददयांवर दोनदा पुरावा देणे सोयीचे होणार नसल्याने दोन्ही दावे एकत्ररित्या चालविण्यात यावे अशी विनंती केली आहे. त्यानंतर वादीतर्फे **ए.आय.आर. १९९४ गुजरात ४२ व (१९७४) महाराष्ट्र लॉ जर्नल ३३४** असे दोन न्यायनिवाडे दाखल करुन न्यायालयास दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १५१ नुसार पक्षकारांच्या संमतीशिवाय देखील दोन दावे एकत्रपणे चालविण्याबाबत आदेश पारित करता येईल असे कथन केले.

**६.** प्रतिवादीतर्फे युक्तीवादादरम्यान असे कथन करण्यात आले की, सदर दोन्ही दाव्यातील दाव्यास घडलेले कारण व मागण्या वेगवेगळया असून पक्षकार देखील एकसारखे नाहीत. त्यामुळे दोन्ही दाव्यातील पुरावा स्वतंत्रपणे नोंदवणे गुंतागुंत न होउ देण्याकरीता आवश्यक आहे. त्यामुळे वादीचा अर्ज मंजूर होण्यास पात्र नसल्याचे कथन करुन **२००६ ए.आय.आर. (राजस्थान) ११९ व १९९० ए.आय.आर. (कर्नाटक) २२२** हे दोन न्यायनिवाडे दाखल केले. सदर न्यायनिवाडयातील निर्वाळयानुसार दाव्याचे कारण एकसारखे नसल्यास प्रत्येक वादीवर ते शाबीत करण्याची स्वतंत्र जबाबदारी निश्चीत होत असल्याने स्वतंत्र पुरावा घेणे आवश्यक आहे. त्यामुळे सदरच्या दोन्ही दाव्यांना एकत्रीतपणे चालवणे कायदेशीर नसल्याचे प्रतिवादीतर्फे नमूद करण्यात आले.

**७.** दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील दस्तऐवजाचे अवलोकन केले असता प्रस्तुत दावा दावा मिळकतीचा ताबा मिळणेसाठी, वैकल्पीक रित्या वाटपाकरीता व दरम्यानचे उत्पन्नाकरीता तसेच दावा मिळकतीतील बोअरवेलचे

खर्च व उत्पन्नाबाबत खुलासा देण्याबाबत दाखल केला आहे. तसेच त्यातील वादीतर्फे कागदयादी नि.क्र.२२ सोबत दाखल केलेली रे.मु.नं.४७/२०२३ मधील नि.क्र.०१ पाहता सदरचा दावा वादीचे दावामिळकतीतील ताबे वहिवाटीस प्रतिवादीने हरकत अडथळा करु नये. याकरीता निरंतर मनाईसाठी दाखल केल्याचे दिसून येते. दावा क्र. ४३/२०२३ चे कामी राजू जगन बाजड व इंद्रायणी उर्फ इंदूबाई जगन बाजड हे वादी असून जगन विश्राम उर्फ पांडुरंग बाजड व विकास जगन बाजड हे प्रतिवादी आहेत. याउलट दावा क्र.४७/२०२३ चे कामी जगन पांडुरंग उर्फ विश्राम बाजड हे वादी असून राजू जगन बाजड हे प्रतिवादी आहेत. सदर दोन्ही दाव्यातील वादी प्रतिवादी पाहता दावा क्र.४३/२०२३ मध्ये दावा क्र.४७/२०२३ पेक्षा वादी प्रतिवादी म्हणून जादा पक्षकार समाविष्ट असल्याचे दिसून येते.

८. दावा क्र.४३/२०२३ व दावा क्र.४७/२०२३ या दोन्ही दाव्यातील दावा मिळकती एकच असल्या तरी दोन्ही दाव्यातील वादीतर्फे करण्यात आलेल्या मागण्या भिन्न स्वरुपाच्या आहेत. दावा क्र.४३/२०२३ या दाव्यास दिनांक ०२.०५.२०२३ चे पूर्वी व नंतर कारण घडलेले असून दावा क्र.४७/२०२३ यास दिनांक ०२.०६.२०२३ रोजी कारण घडल्याचे स्पष्ट होते. सदर दोन्ही दाव्यांचे अवलोकन करता त्यातील पक्षकार, दाव्यास कारण व दाव्यातील मागण्या या एकसारख्या दिसून येत नसल्याने निश्चीतपणे दोन्ही दाव्यातील मागण्यांच्या अनुषंगाने स्वतंत्र मुददे काढले जाणार असून सदर मुददयांसंदर्भातील पुरावा देखील दोन्ही दाव्यातील वादींना स्वतंत्रपणे दाखल करणे आवश्यक ठरते. त्यामुळे सदरचे दोन्ही दाव्यातील केवळ दावा मिळकत एकसारखी असल्याने दोन्ही दावे एकत्र चालवणे न्यायोचित ठरणार नाही. वादीतर्फे प्रस्तुत अर्जाचे अनुषंगाने दाखल केलेल्या न्यायनिवाडयातील वस्तूस्थिती भिन्न स्वरुपाची असल्याने सदरचे न्यायनिवाडे या ठिकाणी लागू होत नसल्याचे स्पष्ट होते. याउलट प्रतिवादीतर्फे दाखल केलेल्या न्यायनिवाडयातील निर्वाळा दावा क्र.४३/२०२३ व ४७/२०२३ चे अवलोकन करता ब—याच अंशी लागू होत असल्याचे दिसून येते.

९. वर नमूद परिस्थीती विचारात घेता दावा क्र.४३/२०२३ व दावा क्र. ४७/२०२३ हे दोन्ही दावे एकत्रितपणे चालवून निकाली करणे गैरसोयीचे होणार असल्याचे स्पष्ट होत असल्याने वादींचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित नसल्याचे निष्कर्षापत येउन मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

# <u>आदेश</u>

१. वादींचा नि.क्र.२० वरील अर्ज नामंजुर करण्यात येतो.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

(सदर आदेश खुल्या न्यायालयात जाहीर करणेत आला.)

स्वा/—

दि. ०३/०८/२०२४

(पी.व्ही.सपकाळ)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
रिसोड जि. वाशिम

## <u>शेरा</u>

मी शपथेवर सांगतो की, आदेशातील मूळ मजकूर व पी.डी.एफ. मधील मजकूर शब्द—न—शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नांव | : | पी.व्ही.सपकाळ<br>दिवाणी न्यायाधीश क.स्तर, रिसोड |
| लघुलेखकाचे नांव | : | हर्षाली अ. उचाडे |
| निकाल तारीख | : | ०१/०८/२०२४ |
| पिठासीन अधिका—याने आदेशपत्रावर सही केलेचा दिनांक | : | ०१/०८/२०२४ |
| निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक | : | ०१/०८/२०२४ |